NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

YEAR : 37) 1st November 2012 (No. of Pages 8 ) ( No : 10

# MINUTES

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on *SUNDAY, the***

***7 th October, 2012 at* Shri Shivaji Arts, Com. & Science College, Near Rly Station, Akola**

General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.00 noon on Sunday, the 7th October, 2012 at Shri Shivaji Arts, Com. & Science College, Near Rly Station, Akola. Prof. P. B. Raghuwanshi President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

0044, 0048, 0497, 0797, 1122, 1161, 1177, 1217, 1302, 1685, 1763, 1792, 1793, 1948, 2009, 2035, 2047, 2049, 2114, 2414, 2439, 2455, 2570, 2665, 2720, 2944, 2985, 2994, 3038, 3079, 3098, 3109, 3182, 3258, 3276, 3277, 3303, 3319, 3327, 3336, 3341, 3351, 3432, 3451, 3464, 3471, 3492, 3494, 3495, 3534, 3550, 3600, 3609, 3619, 3630, 3706, 3799, 3863, 3867, 3890, 3894, 3929, 3983, 3983, 3988, 3997, 4019, 4023, 4045, 4113, 4133, 4138, 4169, 4170, 4189, 4207, 4216, 4219, 4221, 4279, 4288, 4410, 4416, 4423, 4428, 4429, 4492, 4533, 4865, 4914, 4918, 4987, 5032, 5167, 5177, 5189, 5246, 5298, 5299,

Agenda of the General Body meeting was circulated on pages 61 to 64 of 2012 NUTA Bulletin.

### ITEM NO. 576 :

### *CONFIRMATION OF MINUTES :*

**CONFIRMED** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 13th May, 2012 at Shri. Mathuradas Mohota College of Science, Sakkardara Square, Nagpur .

*Notes :- 1) Copy of the minutes was Circulated on pages 46 to 50 of 2012 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 13th May, 2012. vide No.CIM/33 Dated 15 th July, 2012 published on page 47 of 2012) NUTA Bulletin. No correction was received.*

### विषय क्रमांक ५७६ (अ) :

### *प्रा. पुंडलिक धुमाळे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.*

प्रा. पुंडलिक धुमाळे यांच्या दुःखद निधनाबद्दल प्राचार्य शंकरराव सांगळे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

प्रा. पुंडलिक धुमाळे भूतपूर्व मराठी विभागप्रमुख व उपप्राचार्य फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ यांचे १५ मे २०१२ रोजी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. प्रा. धुमाळे मराठी विषयाचे गाढे अभ्यासक व प्रसिद्ध साहित्यिक होते. उत्कृष्ट वक्ता आणि विचारवंत होते. महाराष्ट्रातील सुप्रसिध्द मराठी मासिकातून त्यांचे लेख व कथा प्रसिद्ध होत असत. अनेक वर्तमान पत्रांचे ते स्तंभ लेखकही होते. प्रा. धुमाळे नुटाचे सक्रिय सभासद होते. नुटा संघटना त्यांच्या परिवाराच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

### विषय क्रमांक ५७६(ब) :

### *प्राचार्य मधुसुदन जोहरी यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.*

प्राचार्य मधुसुदन जोहरी यांच्या दुःखद निधनाबद्दल प्राचार्य शंकरराव सांगळे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

फुलसिंग नाईक महाविद्यालय पुसद, जि. यवतमाळ येथील सेवानिवृत्त प्राचार्य मधुसुदन जोहरी यांचे दि. ५ ऑगस्ट २०१२ रोजी दुःखद निधन झाले. ते या महाविद्यालयाचे दीर्घकाळ प्राचार्य राहिले. अमरावती विद्यापीठाच्या वाणिज्य विद्याशाखेत त्यांनी भरीव योगदान दिले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचेही ते सभासद होते. नुटा संघटनेचे सक्रिय सभासद म्हणून त्यांनी प्राध्यापकांच्या अनेक आंदोलनात भाग घेतला होता. नुटा संघटनेची आजची ही आमसभा त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

### विषय क्रमांक ५७६(क) :

### *प्रा. डॉ. संजय अजाबराव चव्हाण यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.*

प्रा. डॉ. संजय अजाबराव चव्हाण यांच्या दुःखद निधनाबद्दल प्राचार्य शंकरराव सांगळे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

उमरखेड जि. यवतमाळ येथील श्रीमती गोपीकाबाई गावंडे महाविद्यालयातील रसायनशास्त्र विषयाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. संजय अजाबराव चव्हाण यांचे ऑगस्ट २०१२ च्या पहिल्या आठवड्यात हृदयविकाराच्या धक्क्याने अकाली निधन झाले. रसायनशास्त्राचे ख्यातनाम प्राध्यापक म्हणून ते प्रसिद्ध होते. नुटा संघटनेचे ते आजीवन सदस्य होते. नुटा संघटना त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

### विषय क्रमांक ५७६(ड) :

### *प्रा. आर. डी. अग्निहोत्री यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.*

प्रा. आर. डी. अग्निहोत्री यांच्या दुःखद निधनाबद्दल प्राचार्य शंकरराव सांगळे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

दि. २० सप्टेंबर २०१२ रोजी अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ येथील इंग्रजी विभागातील सेवानिवृत्त प्राध्यापक श्री. आर. डी. अग्निहोत्री यांचे दुर्धर आजाराने दुःखद निधन झाले. प्रा. अग्निहोत्री यांची मुळ नेमणूक जी.एस. कॉलेज खामगांव इथे झाली होती. तिथे ते सरप्लस झाले. नुटा संघटनेने केलेल्या संघर्षामुळे त्यांना पी ५ कॅटेगीरी मिळून त्यांचे समायोजन अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथे झाले. तेथूनच ते सेवानिवृत्त झाले होते. नुटा संघटनेचे ते आजीवन सदस्य होते. त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात नुटाची ही आमसभा सहभागी आहे.

### विषय क्रमांक ५७६(इ)

### *प्रा. आर. टी. गावंडे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.*

प्रा. आर. टी. गावंडे यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा. एन. एच. व्यास यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील प्रा. आर. टी. गावंडे यांचे दि. १३ ऑगस्ट २०१२ रोजी दुःखद निधन झाले. ते या महाविद्यालयात वाणिज्य विषयाचे प्राध्यापक होते. नुटा संघटनेचे सक्रिय सभासद म्हणून त्यांनी आपल्या सेवा काळात कार्य केले. नुटा संघटनेची आजची ही आमसभा त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्यास

चिरशांती देवो ही प्रार्थना.

### ITEM NO. 577 :
### *APPROVAL TO THE AUDITED STATEMENTS :*

**(A) CONSIDERED** and **APPROVED** the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the year ended on 31st March, 2012.

***Notes*** *: (i) The copy of the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the said Financial year was circulated on page 62 of 2012 NUTA Bulletin.*

*(ii) The Audited Balance Sheet and Income and Expenditure Account were placed before the General Body by Dr. B.T.Gawande, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

### ITEM NO. 578 :
### *STATEMENT ON FIXED SECURITIES POSITION :*

**NOTED** the Statement no. 23 showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2012.

***Note :*** *(i) Statement no.23 regarding the fixed securities of the Association as on 31st March, 2012, was circulated on page 63 of 2012 NUTA Bulletin.*

*(ii) The Statement showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2012, were placed before the General Body by Dr. B.T.Gawande, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

### विषय क्रमांक : ५७९
### *'घटना दुरुस्ती' बदल अहवालास मा. धर्मदाय आयुक्तांची मान्यता मिळणे.*

नुटाच्या आमसभेने दि. २७ फेब्रुवारी २०११ रोजी झालेल्या बैठकीत विषय क्रमांक ५३१ च्या अंतर्गत सम्मत केलेल्या घटना दुरुस्ती बदल अहवालास मा. धर्मदाय आयुक्तांची मान्यता मिळाल्याची **नोंद घेण्यात आली.**

***नोट*** *:- घटना दुरुस्ती अहवाल सन २०१२ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक ६४ वर प्रसृत करण्यात आला होता.*

### विषय क्रमांक : ५८०
### *वाढीव महागाई भत्ता विलंबाने लागू करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी*

कार्यकारी मंडळाच्या वतीने डॉ. सुभाष गवई यांनी मांडलेला पुढील ठराव सम्मत करण्यात आला :-

**(१)** वाढीव महागाई भत्ता शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोबतच अनुदानित संस्थेतून काम करणाऱ्या सर्व पात्र कर्मचाऱ्यांना एकाच वेळी लागू करावा असे शासनाचे स्पष्ट आदेश असतांना उच्च शिक्षण संचालकांच्या सततच्या गलथान कारभारामुळे गेल्या वर्ष दिड वर्षात दरवेळी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना तो विलंबाने लागू केला जात आहे. दिनांक ९ एप्रिल २०१२ च्या शासननिर्णयाने ५८ टक्क्यावरुन ६५ टक्के वाढविण्यात आलेला वाढीव महागाई भत्ता १ एप्रिल २०१२ पासून रोखीने देण्यात यावा अशी तरतुद स्पष्टपणे शासननिर्णयात असतांना विद्यापिठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना ही वाढ अजूनही लागू करण्यात आलेली नाही. **उच्च शिक्षण संचालकांच्या या गलथानपणाचा तीव्र निषेध करण्यात येत आहे.**

**(२)** विद्यमान उच्च शिक्षण संचालकांनी कारभार हाती घेण्यापूर्वीच्या ५-१० वर्षात असा विलंब कधीही झाल्याचे आढळून येत नाही. शालेय शिक्षण विभागामध्ये मात्र याबाबतचा गलथानपणाचा कारभार सर्व शिक्षकांसाठी डोकेदुखी होवून बसलेला होता. शेवटी शालेय शिक्षण विभागाने दिनांक २३ डिसेंबर २००८ रोजी एक आदेश (क्रमांक : शिकाना २००८(५७/०८)/माशि-२) काढून सर्व अधिकाऱ्यांना असे कळविले की, **"वित्त विभागामार्फत वाढीव महागाई भत्त्याचे आदेश निर्गमित करतांना शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचारी असा उल्लेख करतात.** इतर पात्र कर्मचाऱ्यांमध्ये राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा अंतर्भाव होतो.......**महागाई भत्ता लागू करण्यासाठी स्वतंत्रपणे पुन्हा आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही."** २३ डिसेंबर २००८ च्या उपरोक्त आदेशाच्या परिच्छेद ५ मध्ये शिक्षण संचालकांना असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत की :- "राज्य शासनामार्फत यापुढे देय होणारा वाढीव महागाई भत्ता पात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देतांना तो नियमित तरतुदीतूनच शासन निर्णयात नमूद केलेल्या महिन्यात देण्याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना निदेश देण्यात यावेत." त्याच आदेशात शेवटी परिच्छेद ६ मध्ये स्पष्टपणे गंभीर स्वरुपाच्या कारवाईचा इशारा पुढील शब्दात देण्यात आलेला आहे. :- **"वाढीव महागाई भत्ता विहीत महिन्यात अदा न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध गंभीर स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल, याबाबतही सर्व संबंधितांना कृपया जाणिव करुन देण्यात यावी."**

**(३)** उपरोक्त आदेशानंतर शालेय शिक्षण विभागातून ही व्याधी समुळ नष्ट झाली असली तरी उच्च शिक्षण विभागात मात्र गेल्या वर्ष दोन वर्षात या व्याधीने बराच जोर धरलेला आहे असे दिसून येते. ९ एप्रिल २०१२ च्या शासननिर्णयामध्येच स्पष्टपणे "शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जानेवारी, २०१२ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५८ टक्क्यांवरुन ६५ टक्के करण्यात यावा. दि. १ एप्रिल, २०१२ पासून सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी. दि. १ जानेवारी, २०१२ ते दि. ३१ मार्च, २०१२ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील." असे नमुद आहे. त्याच शासननिर्णयात पुढे परिच्छेद ३ मध्ये "महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढेही लागू राहतील." अशी तरतुद असून परिच्छेद ४ मध्ये "सदर आदेश सुधारित वेतनसंरचनेत वेतन अनुज्ञेय असलेल्या संस्थामधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील." **असे आदेशीत केलेले आहे. असे असतांना उच्च शिक्षण संचालकांनी मात्र या शासन निर्णयाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे.**

**(४)** महागाई भत्त्याची वाढ वित्त विभागाच्या एकाच शासन निर्णयाने उच्च शिक्षण विभागासह सर्व सरकारी कर्मचारी व अनुदानित संस्थामधील सर्व पात्र कर्मचारी यांना लागू होत असतांना, ती आपल्या विभागात दरवेळी अक्षम्य विलंबाने लागू करण्याच्या उच्च शिक्षण संचालकांच्या कृतिचा तिव्र धिक्कार करण्यात येत असून अशासकिय अनुदानित अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापकांना शासकीय कर्मचाऱ्यांना लागू होईल त्या तारखेपासून वाढीव महागाई भत्ता आम्ही देवू, मात्र अशासकिय अनुदानित कला, वाणिज्य विज्ञान व विधी महाविद्यालयातील प्राध्यापकांना आम्हाला वाटते तेवढ्या उशिराने आम्ही वाढीव महागाई भत्ता लागू करू. **ही उच्च शिक्षण संचालकांची भेदभावपूर्ण कृती निषेधार्ह आहे.**

**(५)** एक म्हणजे शासकीय आदेशांची अवहेलना करुन उच्च शिक्षण विभागात विलंबाने अम्मलबजावणी करण्यास कोण अधिकारी जबाबदार आहेत व दुसरे म्हणजे काही अनुदानित महाविद्यालयात तो वेळेवर लागू करणे व अन्यत्र तो बहू विलंबाने लागू करण्याच्या बाबतीत कोण अधिकारी जबाबदार आहेत **या दोनही बाबींची चौकशी करण्यात येवून जबाबदारी निश्चित झालेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

### विषय क्रमांक : ५८१
### *महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा आंदोलनाचा ठराव*

सन २०१२ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक ७७ ते ८७ वर प्रसृत करण्यात आलेला ठराव **प्रा. सुभाष गवई यांनी मांडला.**

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेला ठराव विचारात घेण्यात आला व **त्या ठरावाशी सहमती व्यक्त करण्यात आली.**

सर्व शक्तीनिशी उपरोक्त आंदोलन यशस्वी करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करण्याचा **निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.**

### विषय क्रमांक : ५८२
### *नेट-सेट मुक्त शिक्षकांची मा.उच्च न्यायालयासमोर याचिका*

अध्यक्षांच्या अनुमतीने व सभागृहाच्या सम्मतीने प्रा.बी.टी.देशमुख यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव विचारात घेण्यात आला **व सम्मत करण्यात आला.** :-

**[१] या सभागृहाच्या असे लक्षात आले आहे की,** मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे २० नेटसेट मुक्त शिक्षकांनी ४५३७ ऑफ २०११ या क्रमांकाची एक याचिका दाखल केली आहे. त्या याचिकेमध्ये मा. न्यायालयाकडे पुढील प्रमाणे याचना करण्यात आलेली आहे. :-

"(A) Issue suitable writ, order or direction and quash and set aside the communication dated 30.3.2010 (Annexure R) issued by respondent no. 1 as being illegal and bad in law.

(B) Issue suitable writ, order or direction and quash and set aside the communication dated 3.6.2010 (Annexure S) issued by respondent no. 2 to the extent it withdraws the exemptions granted to the petitioners in its 468 th meeting held on 23.2.2010 as being illegal and bad in law.

(C) Issue suitable writ, order or direction and declare that the exemptions granted by respondent no. 2 in its 468th meeting held on 23.3.2010 (Annexure O) are applicable from the initial appointment of the petitioners." (Here the first respondent is Union of India, and the second respondent is University Grants Commission)

**[२] या आमसभेच्या असेही लक्षात आले आहे की,** यावावत राज्यशासनाच्या वतीने (मा. सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग, अमरावती यांनी) एक शपथपत्र दाखल झाले असून या शपथपत्रात **याचिकाकर्त्यांची याचना** पुढील शब्दात नमुद करण्यात आलेली आहे. :-

"In the instant petition the petitioner has sought to challenge the communication dated 30.3.2010 issued by the first respondent i.e. Union of India and also the communication dated 3.6.2010 issued by second respondent i.e. University Grants Commission to the extent it withdraws the exemption granted to petitioners in its meeting held on 23.2.2010. The petitioner has further sought a declaration that the exemptions granted by University Grants Commission in its 468th meeting dated 23.2.2010 are applicable to petitioner from the initial date of appointment." **व पुढे याच शपथपत्रात शासनाची भूमिका नमुद करतांना राज्य शासन** (R3), **उच्च शिक्षण संचालक** (R5), **किंवा सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग, अमरावती** (R6) **यांच्या कृतिबाबत याचिकाकर्त्यांची कोणतीही तक्रार नाही.** हे पुढील शब्दात नमुद करण्यात आलेले आहे. "Thus, a simple glance at all the prayer Clauses made it clear that the petitioner has not made any grievance against the answering respondent Nos. 3, 5 and 6 but against the rest of the respondents....... Thus, it makes clear itself that the petitioner is not aggrieved by any action of the respondent No. 3, 5 and 6 and hence the petition is liable to be dismissed and may kindly be dismissed as against them."

**[३] असे दिसून येते की,** राज्यशासनाच्या वतीने सहसंचालक यांनी "जितक्यास तितके" उत्तर दिले असून याचिकेत मांडलेल्या "पॅऱ्याला पॅरा" असे हे उत्तर आहे. केंद्र शासनाचा ३० मार्च २०१० चा आदेश व विद्यापीठ अनुदान आयोगाने ३ जून २०१० चे आदेश **यांचे ठाम समर्थन सहसंचालकांच्या या शपथपत्रात पुढील शब्दात करण्यात आले आहे.** :-

"In the back ground the decision of the ministry of Human Resources, Higher Education is just proper, fruitful in the age of Higher education. On other hand, the new comers in the system of higher education have been compelled to clear NET or SLET as a mandatory qualification for lectureship. The UGC has not disturbed the services of the petitioners. But the benefits like promotion, senior grade promotion, professor grade promotion is only subject to condition to clear NET or SLET"

**[४]** वस्तुतः याबाबतीत केंद्राच्या शिक्षण विभागाचे ३० मार्च २०१० चे आदेश व त्यावर आधारित विद्यापीठ अनुदान आयोगाचे ३ जून २०१० चे आदेश **ही फार जुनी गोष्ट झालेली आहे.** त्यानंतर प्रवास कितीतरी पुढे गेलेला आहे. :-

*(१)* याचिकाकर्त्यांनी नमुद केलेला ३० मार्च २०१० चा आदेश काढणाऱ्या केंद्र शासनाने पुढे दिनांक ३ नोव्हेंबर २०१० रोजी (मानव संसाधन विभाग) एक आदेश काढला त्यात स्पष्टपणे पुढील उल्लेख आहे :-

"The above mentioned resolution perhaps does not take into account the fact that appointments, If any, pursuant to the date of coming into force of **these regulations are bound to be prospective only. Appointments can never be made with retrospective dates. Similarly, since by Commissions own admission, the regulations are prospective in nature and not retrospective.**" *(P 06 of NB 2010)*

*(२)* एका बाजूला सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत एका मागून एक दिलेले अनेक निर्णय, दुसऱ्या बाजूला खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाचे "**सेवा नेमणूकीच्या दिवसापासूनच धरण्यात येईल**" असे अनेक वर्षापासून अस्तित्वात असलेले नियम, तिसऱ्या बाजूला खुद्द केंद्र शासनाने दिनांक ३ नोव्हेंबर २०१० च्या पत्रान्वये स्पष्टपणे दिलेले पूर्वोक्त आदेश यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने ८ जुलै २०११ रोजीच्या आयोगाच्या बैठकीत फक्त एकट्या महाराष्ट्रासाठी जो निर्णय घेतला त्या निर्णयात असे म्हटले आहे की :-

"**2.09 :** To Consider the **representations** received in respect of lecturers appointed in the State of Maharashtra from 19.09.1991 till 03.04.2000.

The Commission **deliberated** on the issue regarding appointment of various teachers in the State of Maharashtra from September 19,1991 until April 3,2000 and resolved that all such appointments made on regular basis by various universities in the state of Maharashtra where the **university has granted exemption** to teachers from the requirement of NET in terms of the UGC Regulations, 1991 and subsequent Notification dated 24th December, 1998 and where the **representation** has been forwarded to Commission seeking further approval in relation to such regular appointments made during the said period w.e.f. September 19,1991 till April 3, 2000 **is approved.** It further resolved that a communication in this regard be sent

---

**No.CIM/ 34 :** **: Date 30.10.2012**

**CORRECTION**
**in the copy of the Minutes**
**of the General Body Meeting of NUTA**

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on Sunday, the 7th October, 2012 at Shri Shivaji Arts, Com. & Science College, Near Rly Station, Akola. is circulated in this NUTA Bulletin.

If you propose to suggest any correction to the Minutes, it may be pointed out to the Secretary (Dr. Anil Dhage, Secretary, NUTA, Sankalp Sahaniwas, Khare Town, Dharampeth, Nagpur-440 010.) by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the corrections received after the due date to be included in the List of corrections for consideration.

Please send one copy of your letter to Prof. P. B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan Wadi, Rajapeth, Amravati. 444 601.

**- Dr. A. W. Dhage,** ***Secretary, NUTA***

to the universities concerned and the state of Maharashtra" (*P 75 of NB 2011*) या बैठकीच्या कार्यवृत्तामध्ये स्पष्टपणे केंद्र शासनाचे प्रतिनिधी म्हणून मानव संसाधन विभागातर्फे "Shri R.D.Sahay, Director, MHRD also attended the meeting. " असा विशेष उल्लेख आहे.

*(३)* या निर्णयाची प्रमाणित प्रत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने प्राप्त करुन घेतल्यानंतर "विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ८ जुलै २०११ रोजी विषय क्रमांक २.०९ अन्वये महाराष्ट्रातील १९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालखंडातील बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयाच्या बाबतीत" **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक ७ ऑगस्ट २०११ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ३ पुढील प्रमाणे आहे. :-**

"१९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल २००० पावेतो महाराष्ट्रातील सर्व नेमणूका एकाच स्थितीचे दर्शन घडविणाऱ्या असतांना, समान स्थितीमध्ये समान वागणूक न देता, विद्यापीठ अनुदान आयोगाने यापूर्वी तुकड्या तुकड्याने अनेक निर्णय घेतले व त्यामुळे या वर्गवारीतील शिक्षकांची सुद्धा अनेक तुकड्यांमध्ये विभागणी झाली, विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या उपरोक्त निर्णयामुळे या

# उच्च व तंत्रशिक्षण विभाग/विशि-१

## मा. मुख्यमंत्री यांच्या कडे दि. २.५.२०१२ रोजी एमफुक्टो या शिक्षकसंघटनेसमवेत झालेल्या बैठकीचे कार्यवृत..

सदर बैठकीत खालील अधिकारी / पदाधिकारी उपस्थित होते

(१) प्रधान सचिव, वित्त विभाग.

(२) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग

(३) श्री. सदाशिव शिवदास, सहसचिव, उच्च व तंत्रशिक्षण

(४) श्री. विक्रम काळे, वि.प.स

(५) प्रा. बी. टी देशमुख, माजी वि.प.स.

(६) डॉ. पी. आर. गायकवाड, संचालक, उच्च शिक्षण पुणे

(७) श्री. विकास कदम, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग

(८) प्रा. शिवाजीराव पाटील, अध्यक्ष, एमफुक्टो

(९) श्रीमती तापती मुखोपाध्याय, महासचिव, एमफुक्टो

(१०) एमफुक्टो संघटनेचे इतर पदाधिकारी.

२. मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण), मा. राज्यमंत्री (उ.व तंशी) व संघटनेचे पदाधिकारी यांच्या मध्ये सविस्तर चर्चा होवुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले:-

***महाराष्ट्र शासन : बैठक : २०१२/(११०/१२) विशि-१***

*उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२*

**दिनांक : ९ मे, २०१२.**

प्रति,
श्री. शिवाजीराव पाटील, अध्यक्ष, एमफुक्टो,
शिवाई, ३९ रेऊ नगर, ढेकू रोड अमळनेर जि. जळगांव
पिन कोड : ४२५ ४०१

श्री. विक्रम काळे, विधान परिषद सदस्य

श्री. बी. टी. देशमुख, माजी विधान परिषद सदस्य.

**विषय** : एमफुक्टो संघटनेच्या विविध मागण्यांबाबत मा. मुख्यमंत्री यांच्याकडे झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त.

महोदय,

मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २ मे, २०१२ रोजी एमफुक्टो या शिक्षक संघटनेची बैठक झाली. सदर बैठकीचे कार्यवृत्त माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

आपला,
**(विकास तु. कदम)**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत** :- मा. मुख्यमंत्री यांचे खासगी सचिव, संचालक, उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, प्रधान सचिव, (वित्त) यांचे स्वीय सहायक, प्रधान सचिव, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, सहसचिव (मशि) यांचे स्वीय सहायक, उपसचिव (विशि) यांचे स्वीय सहायक, निवड नस्ती. ** FS : P 116 **

१. अकृषि विद्यापीठे व महाविद्यालयातील शिक्षकांना दि. १२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयान्वये सहाव्यावेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचना लागु करण्यात आली. सदर शासन निर्णय मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आला असुन या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. 2(9)(ii) मध्ये दि. १ एप्रिल, २००९ पासुन रोखीने सुधारीत वेतन देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

उक्त दि. १२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी माहे फेब्रवारी, २०१० पासुन करण्यात आली. त्यामुळे १ एप्रिल, २००९ ते ३१ जानेवारी, २०१० या कालावधीतील फरकाची रक्कम १०० टक्के रोखीने देणे आवयक आहे. **ती दोन हप्त्यात देण्याचे ठरले.**

२. दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकाच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रान्वये दिलेले निदेश विचारात घेवुन सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासुन सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचे निदेश दिले आहेत. **या संदर्भात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली.** सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट हि संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन **सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला. सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले. तथापि हे मत आयोगाकडुन लेखी सहमतीत करुन घेण्याचे ही बैठकीत ठरले.** त्याप्रमाणे आयोगास तात्काळ पत्र निर्गमित करावे. उपरोक्त कालावधीतील अध्यापकांच्या सेवा आयोगाकडुन वरीलप्रमाणे सहमती प्राप्त होण्याच्या अधिन सर्व प्रयोजनार्थ नियमित नियुक्तीच्या दिनांकापासुन ग्राह्य धरण्याचे ठरले. **याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर उक्त अध्यापकांना दिनांक ११/१२/१९९९ व दि. १२/०८/२००९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेवुन त्यांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात यावी.**

३. वरीलप्रमाणे स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती केल्यानंतर लाभार्थींना देय होणाऱ्या थकबाकीसंबंधीत मंत्रीमंडळास्तरावर निर्णय घेण्यात येईल.

४. सुधारीत वेतन आयोगानुसार अतिरिक्त खर्चाच्या ८० टक्के प्रतिपुर्ती करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला असुन **सदर प्रस्ताव अद्याप मंजुर झालेला नाही.** यासंदर्भात केंद्र शासनाकडे मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या स्तरावरुन पाठपुरावा करुन सदर रक्कम प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील व तद्नंतर पुढील निर्णय घेण्यात येईल.

५. वरील सर्व निर्णय विचारात घेता एमफुक्टो संघटनेने सुरु केलेले आंदोलन व उत्तरपत्रिका मुल्यांकनाच्या कामावर बहिष्कार त्वरीत मागे घ्यावा.

** FS : P 118 **

वर्गातील शिक्षकांसाठी यापूर्वी घेतलेल्या निर्णयाचे अनेक तुकडे एकत्र आले असून **आता या सर्वांसाठी एकच निर्णय झालेला आहे ही सुद्धा समाधानाची बाब आहे.** *(P 73 of NB 2011)* (या निर्णयात उपरोक्त २० याचिकाकर्ते समाविष्ट आहेत.)

"त्या प्रत्येक नेमणूकीला मान्यता देण्याची केलेली प्रत्येक विनंती (Representation) विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्य केलेली असतांना हा निर्णय महाराष्ट्र शासनाला व विद्यापीठांना कळवितांना कोणतीही गोष्ट मोघमपणे कळवून चालणार नाही. या निर्णयामध्ये अंतर्भूत असलेल्या "**प्रत्येक शिक्षकाची सेवा स्थान निश्चितीच्या प्रयोजनासाठी कोणत्या दिनांकापासून धरावी**?" या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र शासनाला कळविले पाहिजे अशी मागणी करण्यात येत आहे कारण तसे मा. उच्च न्यायालयाचे आदेशच आहेत व या प्रश्नाचे स्पष्ट व कायदेशीर उत्तर "**नेमणूकीच्या दिनांकापासून**" असेच आहे कारण तसे मा. सर्वोच्च न्यायालयाचेच आदेश आहेत, अत्एव तसे तातडीने कळविले जावे अशी विनंती करण्यात येत आहे." *(P 73 of NB 2011)* असे या ठरावाच्या परिच्छेद ४ मध्ये नमुद आहे.

*(४)* आयोगाचा हा निर्णय महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण खात्याच्या मा. प्रधान सचिवांना १६ ऑगस्ट २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने पत्र पाठवून पुढील शब्दात कळविला होता. :-

"The Commission **deliberated** on the issue regarding appointment of various teachers in the State of Maharashtra from September 19,1991 until April 3,2000 and resolved that all such appointments made on regular basis by various universities in the state of Maharashtra where the **university has granted exemption** to teachers from the requirement of NET in terms of the UGC Regulations, 1991 and subsequent Notification dated 24.12.1998 and where the **representation** has been forwarded to Commission seeking further approval in relation to such regular appointments made during the said period w.e.f. September 19,1991 till April 3, 2000 **is approved.** It further resolved that a communication in this regard be sent to the universities concerned and the state of Maharashtra" *(P 86 of NB 2011)* या

# *महाराष्ट्र शासन : बैठक : २०१२/(११०/१२) विशि-१*

### *उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२*

### दिनांक : १५ मे, २०१२.

प्रति,
श्री. शिवाजीराव पाटील, अध्यक्ष, एमफुक्टो,
शिवाई, ३९ रेऊ नगर, ढेकू रोड, अमळनेर, जि. जळगांव
पिन कोड : ४२५ ४०१

विषय : एमफुक्टो संघटनेच्या विविध मागण्यांबाबत.

**संदर्भ : दि. ९ मे, २०१२ चे पत्र व त्यासोबतचे कार्यवृत्त**

महोदय,

एमफुक्टो या शिक्षक संघटनेने उत्तरपत्रिका मुल्यांकनावर घातलेल्या बहिष्काराच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) व मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची वेळोवेळी चर्चा झाली. **त्याअनुषंगाने संदर्भाधीन पत्रान्वये शासन स्तरावरील कार्यवाहीबाबत आपणास अवगत करण्यात आले आहे.** यासंदर्भात वेळोवेळी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून प्राप्त झालेल्या दि. १५.३.२०१२ च्या पत्रान्वये केलेल्या खुलाश्याच्या अनुषंगाने शासनाच्या दि. ७ मे, २०१२ च्या पत्रान्वये आवश्यक ते मार्गदर्शन व खुलासा करण्याची विनंती विद्यापीठ अनुदान आयोगाकडे करण्यात आली होती. त्यास अनुसरुन विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या क्रमांक - F.1-3/2011 (PS) Exemp. दिनांक ११ मे, २०१२ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे खुलासा केला आहे.

The factual position on the subject is given as under :-

The actual date of grant of exemption shall be the date when exemption was granted by the universities to the candidates concerned appointed on regular basis during the period w.e.f. 19.9.1991 to 03.04.2000.

Further, it may also be mentioned that UGC, all along, has been maintaining the aforesaid position.

**विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या वरील पत्रात नमुद केल्यानुसार दि. १९.९.१९९१ ते ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट सेट अध्यापकांच्या वरीलप्रमाणे स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती बाबत व त्याअनुषंगाने येणाऱ्या थकबाकी संदर्भात माहे जून, २०१२ अखेर पर्यंत मंत्रिमंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येईल व त्यानंतर आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात येतील.**

तसेच दि. ९ मे, २०१२ च्या पत्रासोबतच्या इतिवृत्तातील मुद्दा क्रमांक - १ बाबत दि. १ एप्रिल, २००९ ते ३१ जानेवारी, २०१० या कालावधीतील फरकाची रक्कम १०० टक्के रोखीने देणे आवश्यक असून ती दोन हप्त्यात देण्याचे ठरले. **सदरील दोन हप्त्यापैकी पहिला हप्ता जून, २०१२ व दुसरा हप्ता एप्रिल, २०१३ मध्ये अदा करण्यात येईल.**

यास्तव आपण विद्यार्थी, पालक व सामाजिक जबावदारीची जाणीव लक्षात घेऊन उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाच्या कामावर घातलेला बहिष्कार व त्याअनुषंगाने सुरु असलेले आंदोलन तात्काळ मागे घेऊन उत्तरपत्रिका मुल्यांकनाचे काम सुरु करावे.

आपला
**(रा.गो. जाधव)**
उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग

** FS : P 120 **

पत्राची प्रत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला सुद्धा देण्यात आली होती.

*(५)* खरे म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाचा हा निर्णय अतिशय सोपा व सरळ होता. **विद्यापीठाने केलेली अशी प्रत्येक विनंती आयोगाने मान्य केली आहे. याचा अर्थ त्या प्रत्येक अधिव्याख्यात्याची सेवा नेमणूकीच्या दिनांकापासूनच धरावी असा होतो** व यापेक्षा वेगळा होत नाही पण त्याउपर सुद्धा महाराष्ट्र शासनातील काही अधिकाऱ्यांनी "कोणत्या तारखेपासून त्याची सेवा धरावी ते विद्यापीठ अनुदान आयोगाने आम्हाला कळविले पाहिजे." असा आग्रह धरला. तेंव्हा विद्यापीठ अनुदान आयोगाने स्पष्ट शब्दात दिनांक २६ ऑगस्ट २०११ रोजी पत्र पाठवून "As may be seen from the above decision of the commission, the commission has taken the said decision in respect of all such appointments made on regular basis by various universities during the period from September 19, 1991 to April 3, 2000. Therefore the services of such teachers **for all purposes should be counted from the date of their regular appointment.** " असे कळविले. *(P 87 of NB 2011)*

*(६)* महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांनी दि. २ डिसेंबर २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांना नेट-सेट मुक्त प्राध्यापकांच्या बाबत एक पत्र *(P 18 of NB 2012)* देऊन यु.जी.सी. ने महाराष्ट्रातील नेट-सेट ग्रस्त प्राध्यापकांबद्दल कायदे व नियमांना धरुन घेतलेल्या सकारात्मक आणि धोरणात्मक निर्णयाविरुद्ध आगपाखड केली होती. उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांनी पाठविलेल्या पत्रात "Therefore it is very absurd on the part of UGC..." असा उल्लेख करुन आपल्या मर्यादांचे उल्लंघन केले होते. "absurd'' या शब्दाचा शब्दकोषात असलेला मराठीतील अर्थ "मुर्खपणा, असमंजस, अयोग्य, हास्यास्पद" असा होतो. यु.जी.सी.ला "मुर्ख, असमंजस, हास्यास्पद" ठरविणाऱ्या व ते देखील लेखी स्वरुपात कळविणाऱ्या महाराष्ट्राच्या उच्चशिक्षण विभागाच्या सचिवांच्या या पत्रावर तिव्र आक्षेप घेणारे एक निवेदन *(P 17 of NB 2012)* महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक २८ जानेवारी /१३ फेब्रुवारी २०१२ रोजी पाठविले होते. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १५ मार्च २०१२ रोजी उत्तरादाखल जे पत्र (By Speed Post : No. F-13/2011(PS) ) महासंघाला पाठविले, त्या पत्राचा विषयच मुळात "**Subject :** Unwarranted request from Principal Secretary, Higher Education, Government of Maharashtra to the UGC for reverting the decision on grant of exemption and regularization services of non NET/SET teachers in Maharashtra appointed during 19.09.1991 till 03.04.2000." असा होता व त्यात " With reference to your letter No. Nil dated 13th February, 2012 on the subject cited above, I am directed to inform you that the actual date of effect for grant of exemption to a particular candidate shall be the date of exemption actually granted by the universities to the concerned candidate appointed on Regular Basis'' असे स्पष्टपणे नमुद केलेले होते. *(P 29 of NB 2012)*

*(७)* महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या विविध मागण्यांबाबत मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २ मे २०१२ रोजी झालेल्या बैठकीचे एक लिखित कार्यवृत्त महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना दिनांक ९ मे २०१२ रोजीच्या पत्रान्वये उच्च शिक्षण विभागाने पाठविले होते. त्या पत्रात **"मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण), मा. राज्यमंत्री (उ.व तंशी) व संघटनेचे पदाधिकारी यांच्या मध्ये सविस्तर चर्चा होवुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले**:-" असे नमुद करुन सोबत २ मे २०१२ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त जोडलेले आहे. *(P 92 of NB 2012)* या कार्यवृत्तातील परिच्छेद २ हा नेट-सेटबाबत असून त्याचा पूर्वार्ध व उत्तरार्ध शब्दशः पुढील प्रमाणे आहे. :-

"२. दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकाच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रान्वये दिलेले निदेश विचारात घेवुन सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासुन सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचे निदेश दिले आहेत. **या संदर्भात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली.** सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट हि संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला. **सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले.**

**तथापि हे मत आयोगाकडुन लेखी सहमतीत करुन घेण्याचे ही बैठकीत ठरले.** त्याप्रमाणे आयोगास तात्काळ पत्र निर्गमित करावे. उपरोक्त कालावधीतील अध्यापकांच्या सेवा आयोगाकडुन वरीलप्रमाणे सहमती प्राप्त होण्याच्या अधिन सर्व प्रयोजनार्थ नियमित नियुक्तीच्या दिनांकापासुन ग्राह्य धरण्याचे ठरले. **याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर उक्त अध्यापकांना दिनांक ११/१२/१९९९ व दि. १२/०८/२००९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेवुन त्यांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात यावी.** " *(P 34 of EX- 2012)*

*(८)* महाराष्ट्र शासनाच्या या उपरोक्त कार्यवृत्ताच्या परिच्छेद २ चे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास मा. मुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत पुढील गोष्टी निश्चितपणे ठरल्या असे राज्याच्या मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी महासंघाच्या अध्यक्षांना कळविले. त्या पुढील प्रमाणे :-

(१) दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकाच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रान्वये दिलेले निदेश विचारात घेवुन सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासुन सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचे निदेश दिले आहेत.

**(२) या संदर्भात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली.**

(३) सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट हि संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला.

(४) **"सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले."** असा महाराष्ट्र शासनाचा निर्णय स्पष्टपणे तेथे नमुद आहे.

**(५) तथापि हे मत आयोगाकडुन लेखी सहमतीत करुन घेण्याचेही बैठकीत ठरले.**

(६) त्याप्रमाणे आयोगास तात्काळ पत्र निर्गमित करावे. उपरोक्त कालावधीतील अध्यापकांच्या सेवा आयोगाकडुन वरीलप्रमाणे सहमती प्राप्त होण्याच्या अधिन सर्व प्रयोजनार्थ नियमित नियुक्तीच्या दिनांकापासुन ग्राह्य धरण्याचे ठरले.

**(७) याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर उक्त अध्यापकांना दिनांक ११/१२/१९९९ व दि. १२/०८/२००९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेवुन त्यांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात यावी.**

*(९)* मा. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत दिनांक २ मे रोजी **"सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले...... तथापि हे मत आयोगाकडुन लेखी सहमतीत करुन घेण्याचेही बैठकीत ठरले."** त्याप्रमाणे उच्च शिक्षण विभागाने ७ मे २०१२ रोजी एक पत्र पाठवून "आवश्यक ते मार्गदर्शन व खुलासा करण्याची" विद्यापीठ अनुदान आयोगाला विनंती केली. विद्यापीठ अनुदान आयोगाने या पत्राचे ताबडतोबच ११ मे २०१२ रोजी उत्तर पाठविले (F.1-3/2011 (PS) Exemp.) व महाराष्ट्र शासनाला पुढील प्रमाणे कळविले. :-

"The factual position on the subject is given as under :- **The actual date of grant of exemption** shall be the date when exemption was granted by the universities to the candidates concerned appointed on regular basis during the period w.e.f. 19.9.1991 to 03.04.2000.

Further, it may also be mentioned that UGC, all along, has been maintaining the aforesaid position."

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना दिनांक १५ मे २०१२ रोजी एक पत्र *(P 93 of NB 2012)* लिहून उच्च शिक्षण विभागाने विद्यापीठ अनुदान आयोगाचा हा निर्णय कळविला व पुढे त्याच पत्रात महाराष्ट्र शासनाचा निर्णय सुद्धा पुढील शब्दात कळविला. :-

**"विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या वरील पत्रात नमुद केल्यानुसार दि. १९.९.१९९१ ते ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट सेट अध्यापकांच्या वरीलप्रमाणे स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती बाबत व त्याअनुषंगाने येणाऱ्या थकबाकी संदर्भात माहे जून, २०१२ अखेर पर्यंत मंत्रिमंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येईल व त्यानंतर आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात येतील."**

*(९०)* विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २३ फेब्रुवारी २०१० रोजी झालेल्या ४६८ व्या बैठकीत शेकडो शिक्षकांना दिलेले एक्झमशन मागे घेण्याचा निर्णय घेतला. तो निर्णय रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकाकर्त्यांनी त्याच विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या दिनांक ८ जुलै २०११ रोजी झालेल्या ४७९ व्या बैठकीत तुकड्या तुकड्याने घेतलेले आपले जुने सर्व निर्णय मागे टाकून १९ सप्टेबर १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालखंडात महाराष्ट्रात नेमणूका झालेल्या सर्व बिगर नेट-सेट शिक्षकांच्या करीता एकच निर्णय घेतला व तो सुद्धा "Therefore the services of such teachers **for all purposes should be counted from the date of their regular appointment.....** The actual date of grant of exemption shall be the date when exemption was granted by the universities to the candidates concerned appointed on regular basis during the period w.e.f. 19.9.1991 to 03.04.2000." असा एकसारखा निर्णय घेतला व सतत एकामागून एक दिनांक १६ ऑगस्ट २०११, २६ ऑगस्ट २०११, १५ मार्च २०१२ व त्यानंतर ११ मे २०१२ च्या पत्रान्वये आपला निर्णय कायम ठेवला. महाराष्ट्राचे मा. उच्च शिक्षणमंत्री व उच्च शिक्षण सचिव यांच्याशी टेलीफोनवरून झालेल्या बोलण्यात सुद्धा तो निर्णय तसाच सांगितला. इतकेच नव्हे तर ११ मे २०१२ च्या पत्रात ते बोलणे 'कन्फर्म' केले व पुढे त्याच पत्रान्वये "Further, it may also be mentioned that UGC, all along, has been maintaining the aforesaid position." असेही महाराष्ट्र शासनाला कळविले. ही बाब याचिकाकर्त्यांनी मा. उच्च न्यायालयाच्या लक्षात आणून न देणे म्हणजे याचिकाकर्त्यांनी आपलेच नुकसान करवून घेण्याचा प्रकार ठरेल.

*(९१)* विद्यापीठ अनुदान आयोगाने, महाराष्ट्र शासनाला पाठविलेल्या आपल्या दिनांक ११ मे २०१२ रोजीच्या पत्रात "Further, it may also be mentioned that UGC, all along, has been maintaining the aforesaid position." हे वाक्य उगाचच लिहिलेले नाही.

**(A)** विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १९९४ च्या निर्णयाउपरान्त कायदेशिर सल्ला घेतल्यानंतर जे परिपत्रक दिनांक २५ डिसेंबर १९९८ रोजी (D.O. NO. F-2-6/98-PS) निर्गमित केले त्यामध्ये वरिष्ट श्रेणी व निवड श्रेणी प्रदान करतांना पूर्वसेवा धरण्याच्या बाबतीत पुढील आदेश नमुद आहेत :-

"**The Commission after seeking legal opinion on** clause 1(e), has decided to include service rendered in adhoc capacity for counting of past service for placement in Senior Scale/Selection grade, provided, the three conditions, as mentioned hereunder are fulfilled :-

(a) The adhoc service was of more than one year duration;

(b) The incumbent was appointed on the recommendation of duly constituted Selection Committee, and

(c) The incumbent was selected to the permanent post in continuation to the adhoc service, without any break."

**(B)** सन १९९८ मध्ये काढलेल्या उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे तदर्थ सेवा धरण्याचे आयोगाचे त्यावेळचे आदेश आहेत. आयोगाच्या आताच्या निर्णयामध्ये समाविष्ट असलेला प्रत्येक शिक्षक नियमित नेमणूक झालेला आहे. ॲडव्हाक सेवा धरली जात असतांना नियमित सेवा न धरण्याचे कोणतेच कारण असू शकत नाही.

**(C)** Even as late as in 2010 the latest UGC Regulations Notified under No.F.3-1/2009 dated 30th June 2010 dealt with the question of counting of service for placement benefits as under:

"10.0 COUNTING OF PAST SERVICES FOR DIRECT RECRUITMENT AND PROMOTION UNDER CAS:

10.1 (f) The adhoc or temporary service of more than 1 year duration can be counted provided that

(i) The period of service was of more than one year duration

(ii) The incumbent was appointed on the recommendation of duly constituted selection committee and

(iii) The incumbent was selected to the permanent post in continuation to the adhoc or temporary service without any break

**(D)** This is in line with the Hon'ble Supreme Court decision rendered in Sharadendu Bhushan, Appellant v. Nagpur University, Nagpur & Ors, Respondents (AIR 1988, Supreme Court 335) that **experience is the basis of placement.**

*(९२)* विद्यापीठ अनुदान आयोगाने एक्झमशन बाबत एकदा आपल्या ११ मे २०१२ च्या पत्रान्वये राज्य शासनाला "The factual position on the subject is given as under :- **The actual date of grant of exemption** shall be the date when exemption was granted by the universities to the candidates concerned appointed on regular basis during the period w.e.f. 19.9.1991 to 03.04.2000. " असे कळविल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्या शिक्षकांच्या सेवा संपूर्णपणे नियमित होतात. Civil Appeal No. 1819 of 1994, decided on 8-9-1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. (A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA, JJ.) : AIR 1995 SUPREME COURT 336 या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद २४ पूढील प्रमाणे आहे.:-

"24.... As analyzed above, therefore the Delhi University may appoint as a lecturer in itself and its affiliated colleges one who has cleared the test prescribed by the said Regulations or it may seek prior approval for the relaxation of this requirement in a specific case; or it may appoint as lecturer one who does not meet this requirement without having first obtained the UGC's approval, in which event it would if it failed to show cause for it's failure to abide by the said Regulations to the satisfaction of the UGC, forfeit its grant from the U.G.C. If however it did show cause to the satisfaction of the U.G.C., **it not only would not forfeit its grant but the appointment made without obtaining the U.G.C s prior approval would stand regularized.** *(P 316 of NB 2001)*

*(९३)* हे सर्व शिक्षक विद्यापीठाच्या परिनियमाप्रमाणे 'कन्फर्म' झालेले शिक्षक असून दिनांक **१ जानेवारी २००६ या दिवशी कायम अथवा स्थायी आस्थापनेवरील पदधारक या नात्याने अनेक वर्षापासून कार्यरत आहेत.** केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे त्या तारखेला पदस्थ असलेल्या पदधारकांनाच नविन वेतनश्रेणीच्या थकबाकीपोटी येणाऱ्या अर्थभारापैकी ८० टक्के भार केंद्र शासनाने सोसण्याचे मान्य केलेले आहे. केंद्राच्या योजनेत "Financial assistance from the Central Government shall be restricted to revision of pay scales **in respect of only those posts which were in existence and had been filled up as on 1.01.2006.** " अशी स्पष्ट तरतुद आहे. *(P23 of NB 2009)* केंद्र शासनाने १४ ऑगस्ट २०१२ रोजी एक शासननिर्णय (No. F. 1-7/2010-U.II Government of India Ministry of Human Resource Development Department of Higher Education New Delhi,) काढून राज्य शासनाला "Central Government had decided to provide financial assistance, for the period 1.1.2006 to 31.3.2010, to the extent of 80% **as reimbursement to those State Governments,**" असे कळविले आहे. याच शासननिर्णयाच्या परिच्छेद ५

मध्ये केंद्र शासनाने "The condition of enhancement of age of superannuation to 65 years as mentioned in this Ministry's letter dated 31.12.2008 may be treated as withdrawn, for the purpose of seeking reimbursement of central share of arrears to be paid to State University and College teachers." *(P6 of NB 2012)* असेही कळविले असुन पुढे त्याच शासननिर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये केंद्राने "State Governments may please note that reimbursement of 80% of central share of the additionality of payment of arrears, for the period from 1.1.2006 to 31.3.2010, will be made by the Central Government in 2-3 installments. **However, this would be by way of reimbursement only, after the State Government has made the payment.**" असेही नमुद केलेले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाची नेट-सेट मुक्ततेबाबत एकदा मान्यता मिळाली की या शिक्षकांच्या सेवा तर नियमित होतीलच पण त्यांच्या वेतनावरील केंद्राचे किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुज्ञेय अनुदान सुद्धा त्यांना मिळेल असा मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे व भारतात आज हा या विषयावरील अंतिम शब्द आहे. शब्दशः पुढील प्रमाणे :- "..... it not only would not forfeit its grant but the appointment made **without obtaining the U.G.C's prior approval would stand regularized.**" *(P 316 of NB 2001)*

*(१४)* याचिकाकर्ते बहुतेक शिक्षक हे अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील नेट-सेट मुक्त शिक्षक आहेत असे दिसून येते. या शिक्षकांनी उपरोक्त शिवाय पुढील कागदपत्रे मा. उच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देण्यामुळे त्यांच्या याचिकेला निश्चितपणे मजबूती येईल.

(i) अमरावती विद्यापीठाचे तत्कालीन मा. कुलगुरू डॉ. एस.एन.पाटील यांनी दिनांक १० डिसेंबर २०१२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांना पाठविलेले पत्र. (क्रमांक AU/8/10/C-210/2002)

(ii) अमरावती विद्यापीठाने दिनांक २६ मे २०१० रोजी एक प्रमाणपत्र देवून या सर्व शिक्षकांच्या बाबतीत **परिनियमांनी विद्यापीठाला असलेल्या वेतन निश्चितीच्या अधिकारांचा वापर करुन** "**Now therefore, it is hereby certified that** ...... **the service of every teacher** (whose name appears in the said list and who was appointed on or before 4 th April 2000 and in whose case the procedure of placement in Senior Scale/Selection Grade through duly constituted selection committee is completed) **is counted from the date of his/her appointment for the purposes of placement in Senior Scale / Selection Grade."** असे प्रमाणित केले आहे. *(P 8 of NB 2011)*

(iii) परिनियमांनी प्रदान केलेल्या विधिमय अधिकारांचा वापर करुन त्याप्रमाणे विद्यापीठाने स्थाननिश्चिती करुन दिलेल्या अनेक शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीचे वेतन सक्षम अधिकाऱ्यांनी यापूर्वीच मंजूर केले असून त्यांना ते प्रत्यक्षात गेल्या अनेक महिन्यापासून मिळत आहे.

(iv) नेमणूकीच्या दिनांकापासून सेवा धरुन विद्यापीठाने स्थान निश्चिती करुन दिलेल्या नेटसेट मुक्त काही शिक्षकांना उच्च शिक्षण संचालक अमरावती विभाग अमरावती हे स्थाननिश्चितीनुसारचे वेतन अदा करतात व याचिकाकर्त्यांना वंचित ठेवतात अशी भेदभावपूर्ण कृति करण्याचा त्यांना अधिकार नाही. त्यांची ही कृती भारतीय घटनेच्या खंड १४ चा सरळ सरळ भंग करणारी आहे.

**[५] या आमसभेचे असे मत आहे की** उपरोक्त परिच्छेद [४] मध्ये नमुद केलेली कागदपत्रे यथोचितरित्या आपल्या विधिज्ञांच्या मार्फत मा. उच्च न्यायालयाच्या लक्षात आणून न दिल्यास व फक्त याचिकाकर्त्यांपुरता वेगळा निर्णय झाल्यास त्यांच्यापुरती एक वेगळी विपरीत स्थिती निर्माण होवू शकते. १८ ऑक्टोबर २००१ चा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी नेमलेल्या शिक्षकांना एक्झमशनबाबत दिलेली वागणूक आम्हालाही दिली जावी अशी मागणी करणाऱ्या काही याचिका त्या शासननिर्णयानंतर नेमणूक झालेल्या काही अधिव्याख्यात्यांनी मा. उच्च न्यायालयासमोर दाखल केल्या होत्या. "**शासननिर्णय हे आमची पात्रता ठरविणारे विधिमय माध्यम नाही**" अशी भूमिका त्याप्रकरणी ठामपणे मा. न्यायालयासमोर मांडली गेली नाही. त्यातून पुढे मा. न्यायालयाच्या निर्णयामध्ये ".... those teachers who were appointed between the period from 19.09.1991 to 1.12.1999 and failed to acquire the NET/ SET qualifications by the end of December 2003 cannot be retained in service." "that Government Resolution dated 18.10.2001 is legal valid and it is held proper " अशी वाक्ये आलीत. ही न्यायनिर्णयातील वर्णने (observations) होती. त्यांना निकाल किंवा आदेश (Judgement/Order) हे स्वरुप नव्हते, पण त्या वाक्यांचा वापर करुन पुढे उच्च शिक्षणसचिवांनी त्यातून केवढा अनर्थ काढला होता, याचा नेट-सेट मुक्त शिक्षकांनी विसर पडू देता कामा नये. याचिकाकर्त्यांपैकी श्री. प्यारेलाल सुर्यवंशी व इतर काही व्यक्ती आजच्या आमसभेला उपस्थित आहेत. **संघटनेचे सदस्य असल्यामुळे त्यांना परिच्छेद [४] मध्ये नमुद असलेली महत्वपूर्ण कागदपत्रे यापूर्वीच उपलब्ध झालेली आहेत.** सदस्य असलेल्या याचिकाकर्त्यांना, या ठरावामार्फत व सदस्य नसलेल्या याचिकाकर्त्यांना, सदस्य असलेल्या याचिकाकर्त्यांमार्फत, अशी विनंती करण्यात येत आहे की या प्रकरणाचे एकूणच गांभीर्य लक्षात घेता त्यांनी परिच्छेद [४] मध्ये नमुद असलेली महत्वपूर्ण अशी उपरोक्त कागदपत्रे यथोचितरित्या मा. उच्च न्यायालयासमोर दाखल करण्याची काळजी घ्यावी. **याबाबत कागदपत्रे पुरविण्याच्या बाबतीत याचिकाकर्त्यांना संघटनेतर्फे सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात यावे, असेही ठरविण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक ७८३ :**
**गणसंख्या :**

नुटाच्या घटनेतील खंड ५ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार गणसंख्येच्या अभावी सुरुवातीला सभा अर्धा तासासाठी तहकुब करण्यात आली होती, **ही बाब कार्यवृत्तामध्ये नोंदविण्यात येत आहे**, असे अध्यक्षांनी जाहीर केले.

**विषय क्रमांक ७८४ :**
**सभा व्यवस्थेबद्दल आभार :**

कार्यकारी मंडळाच्या वतीने अध्यक्षांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेचे इतर प्राध्यापक, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य, यांनी ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून **सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.**

| | |
|---|---|
| स्वा / **प्रा. पी. बी. रघुवंशी** | स्वा / **डॉ. अनिल ढगे** |
| ***अध्यक्ष*** | ***सचिव*** |

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **01.11.2012**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

To,..........................................................